पुढारी



गारगोटी : कर्मवीर हिरे महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात बोलताना डॉ. उदय शिंदे. व्यासपिठावर प्रा. के. के. सरगर, प्राचार्य डॉ. जी. एस. म्हांगोरे.

# करिअरसाठी सर्जनशील, कल्पकता गरजेची : डॉ. शिंदे

**गारगोटी : प्रतिनिधी**

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी आपले करिअर घडवण्यासाठी सर्जनशील व कल्पकतेचा अंगीकार करावा. सध्याचे जग कल्पक तरुणाईला प्रोत्साहन देणारे आहे, असे प्रतिपादन डॉ. उदय शिंदे यांनी केले.

कर्मवीर हिरे महाविद्यालयातील वाणिज्य विभागाच्या वतीने आयोजित प्रथम वर्ष विद्यार्थी स्वागत व वाणिज्य मंडळ उद्घाटन समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. प्रास्ताविक व स्वागत डॉ. सागर पोवार यांनी केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. जी. एस. म्हांगोरे होते.

डॉ. शिंदे म्हणाले, विद्यार्थ्यांनी आपले ध्येय ठरवून भवितव्याचे नियोजन करावे. महाविद्यालयीन विविध उपक्रमांत सहभागी होऊन आपले व्यक्तिमत्त्व समृद्ध बनवावे व त्यासाठी सोशल मीडियाचा मर्यादित साधन म्हणून उपयोग करावा. यावेळी वाणिज्य अभ्यास मंडळावर निवड झाल्याबद्दल डॉ. उदय शिंदे यांचा सत्कार करण्यात आला. सुप्रीया गवस हिने सूत्रसंचालन केले. प्रा. सविता वर्णे यांनी आभार मानले.